

**Dr. Minakshi Nalbale - Bhosale**

MBBS, MS (General Surgery), DNB(General Surgery);

**MCh ( Pediatric Surgery)**

B/15, Ajinkya Nagari,Behind

Spencer's Daily, Karvenagar, Pune - 411052

Phone No : 9325427226

Email ID : minakshi_dr@rediffmail.com

Web:- www.childsurgerypune.com (under construction)

# बालकांची निगा आणि बालशल्यविशारद

निरोगी बालक हे सर्व कुटुंबासाठी अतिशय स्फूर्तिदायक आणि मनाला आनंद देणारे असते. तो कुटुंबाचा एक फक्त छोटासा सदस्य एवढीच त्याची ओळख नसून त्याला त्याचे स्वतःचे वेगळे व्यक्तिमत्व असते. लहान मुले ही अत्यंत चैतन्यपूर्ण आणि अमाप ऊर्जायुक्त असतात.

मुले जेव्हा आजारी पडतात तेव्हा त्यांना निष्णात व्यक्तीने केलेल्या विशेष निगराणीची गरज असते. मुले म्हणजे प्रौढांची फक्त लहान प्रतिकृती असे नसते. आपल्या आजारासंबंधी, त्यांच्या लक्षणांबद्दल ती नेहमी संवाद साधू शकत नाहीत. त्यामुळे त्यांच्यावर उपचार करणे सोपे नसते. त्यांची काळजी घेणाया प्रौढ व्यक्तीने त्यांची स्थिती ओळखून त्याप्रमाणे मुलाला जर बरे वाटत नसेल तर त्यानुसार उपचार द्यावयाचे असतात. या ठिकाणी बालशल्यविशारदाचे कौशल्य दिसून येते.

बालशल्यविशारद हे एम. एस् . जनरल सर्जन, तर असतातच पण त्या व्यतिरिक्त त्यांनी लहान मुलांवरील शस्त्रक्रिया, त्यांची गंभीरता, निदान, काही विशेष शस्त्रक्रिया या सर्व प्रश्नांसंबंधी त्यांनी विशेष प्रशिक्षण घेतलेले असते. अशा खडतर प्रशिक्षणानंतर त्यांना M. Ch. Degree in Pediatric Surgery अशी पदवी मिळते. लहान मुलांवर शस्त्रक्रिया करण्यास ते अत्यंत योग्य व निष्णात असतात.

लहान मुलांच्या, सुज येणे, गळू होणे, पोट दुखणे अशा आजारांमध्ये बालशल्यविशारदाची गरज असते. बयाचदा मुलांमध्ये जन्मजात व्यंगे (congenital defects) असतात. ती दुरुस्त करणे हे बालशल्यविशारदाचे महत्वाचे काम असते. आजकाल अशा शारीरिक विकृती किंवा व्यंगाबद्दल असलेल्या जागृतीमुळे, प्रसूतिशास्त्रतज्ञ

*Important Safety Information – Information provided here is NOT medical advice or a prescription against any specific or general Symptom. Please consult your doctor before utilizing the information.*

© *Arogyadarpan.com*

व सोनोलॉजिस्ट मुलाच्या जन्माआधीच गर्भामधील व्यंगाचे निदान करुन संभाव्य आईवडिलांना बालशल्यविशारदाकडे सल्ला घेण्यासाठी पाठवतात.

येथे बालशल्यविशारदाला व्यंग कोणत्या प्रकारचे आहे, महत्वाची इंद्रिये म्हणजे मेंदू, हृदय, यकृत वगैरेशी संबंधित आहे का, मूल किती प्रमाणात अपंग होईल, व्यंग दुरुस्त करता येईल का आणि शस्त्रक्रियेसाठी कोणती वेळ योग्य असेल याचे मूल्यमापन करावे लागते. संभाव्य माता पित्यांशी आणि प्रसूती करणाऱ्या डॉक्टरांशी या संबंधी चर्चा केली जाते. अशा तऱ्हेने योग्य असे उपचार योग्यवेळी (प्रसूतिपूर्व किंवा प्रसूतिनंतर) दिले जाऊ शकतात. पालक मानसिक व आर्थिक दृष्ट्या यामुळे तयारीत राहू शकतात. मूळ सर्व क्रिया सहन होण्यास शारीरिकदृष्ट्या आजारी होण्याआधी त्याच्यावर शस्त्रक्रिया केली जाते त्यामुळे अपंगत्व व मृत्युचा धोका बऱ्याच प्रमाणात टाळता येतो.

या सर्व व्यंग किंवा विकृतींमध्ये इसोफेगल (अन्ननलिका), अट्रेशिया, विथट्रॅकिया (श्वासनलिका) - इसोफेगल फिस्चुला (व्हेअर द गलेट इज कनेक्टेड टू द विंडपाईप),डायफ्रमॅटिक हार्निया (व्हेअर द बॉवेल हॅज बीन डिस्प्लेस्ड इं टू द चेस्ट), बॉवेल ॲट्रेशिया (पार्ट ऑफ द बॉवेल इज नॉट फॉर्मड्), ॲनोरेक्टल मालफॉर्मेशन्स(व्हेअर रेक्टम ॲड ॲनल कॅनॉल आर नॉट नॉर्मली फॉर्मड् ॲड द ॲनॅल ओपनिंग इज ॲबसेंट वगैरे) यांचा समावेश होतो.

बालशल्यविशारद हे अपघातात जखमी झालेल्या मुलांवर उपचार करण्यातही महत्वाची भूमिका बजावतात. बालशल्यविशारद हा/ही मुलांच्या शरीररचनेशी (शस्त्रक्रियेच्या दृष्टीने) चांगला परिचित असल्यामुळे तो/ती शस्त्रक्रियेने व्यंगाची दुरुस्ती करणे किंवा त्यांना निगराणीचा आधार देणे हे जास्त चांगल्या रीतीने करु शकतो/शकते. सर्वसाधारणपणे बालशल्यविशारद हे मुलांच्या जन्मदिवसापासून ते १५ वर्षे वयापर्यंत मुलांवर उपचार करतात.

लोकांना हृदयशल्यविशारद, त्वचारोपण शल्यविशारद अशा विशेष तज्ञ सेवा म्हणून माहिती असतात. परंतु फारच थोड्यांना बालशस्त्रक्रिया व बालशल्यविशारद ही विशेष तज्ञ सेवा माहिती असते. हे विशेषतज्ञ लहान मुले व नवजात अर्भके यांच्यावर शस्त्रक्रिया करण्याचे विशेष प्रशिक्षण घेतलेले असतात.

या लेखाचा उद्देश हा बालशल्यविशारद तज्ञ सेवेबाबतीत लोकांमध्ये जागरुकता निर्माण करणे असून त्यामुळे लहान मुलांचे अनमोल जीवन वाचविण्यास मदत होईल.

*Important Safety Information – Information provided here is NOT medical advice or a prescription against any specific or general Symptom. Please consult your doctor before utilizing the information.*

© *Arogyadarpan.com*